सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांकरीता आवश्यक औषध खरेदी करीता साथरोग नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१०४२८६ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री, ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) व पटकी नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१००६२९ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री, ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली रु.१३,००,०००/- (अक्षरी रुपये तेरा लक्ष फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा -१२२६/प्र.क्र.१००/खरेदी कक्ष

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भाखक/२०१४/प्र.क्र.८२/भाग ॥।/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांचे पत्र क्र.ससंआसे/साथरोग/कक्ष-५८/प्र.मा./५१०५-१२/२०२६, दि.१२.०५.२०२६

प्रस्तावना:-

वाचा मधील क्र.३ येथील सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांच्या दि.१२.०५.२०२६ रोजीच्या प्रस्तवानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांकरीता आवश्यक औषध खरेदी करीता साथरोग नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१०४२८६ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री, ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) व पटकी नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१००६२९ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री, ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली रु.१३,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

२. आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांकरीता सोबतच्या विवरणपत्र-अ, विवरणपत्र-ब व विवरणपत्र-क मधील आवश्यक औषध खरेदी करीता साथरोग नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१०४२८६ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री व पटकी नियंत्रण कार्यक्रम लेखाशिर्ष २२१००६२९ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री या उद्दिष्टाखाली रुपये १३,००,०००/- (अक्षरी रुपये तेरा लक्ष फक्त) एवढया रकमेच्या खर्चास खालील नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) खरेदी करण्यात येणाऱ्या औषधे, उपकरण, मशीनची आवश्यकता, मागणी याची शहानिशा /खातरजमा करण्यात आल्या नंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) खरेदी करण्यात येणाऱ्या औषधे, उपकरणे/मशीनचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतरच सदर बाबींची खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित पध्दतीने खरेदी करावयाच्या बाबींची खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी. हीच बाब खरेदी करण्यात आलेल्या बाबींकरीता तपासूचन प्रलंबित देयकांची अदायगी करावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची संबंधित कार्यक्रम प्रमुख यांनी दक्षता घेण्यात यावी.

७) सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सदरहू खरेदीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा तपशील मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई व सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप,हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे यांनी शासनास सादर करावा.

८) या कामी होणारा खर्च, "मागणी क्र. आर-१, (०१) (४५) साथरोग नियंत्रण कार्यक्रम (कार्यक्रम) , २१-पुरवठा व सामग्री व ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) २२१० ४२८६", "मागणी क्र.आर-१, (०१) (०६) पटकी नियंत्रण कार्यक्रम (राज्य क्षेत्र) अनिवार्य २१-पुरवठा व सामग्री व ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) २२१० ०६२९" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतुन भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

१०) सदर निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी करावयाचा असल्याने अदाता म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

११) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.२४.०२.२०२५ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई संस्थेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि.१४.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार म.को.नि. नमुना क्र.४४ देयकाद्वारे ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत राज्याच्या एकत्रित निधीतून आहरीत केल्या जाणाऱ्या सहाय्यक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक (Virtual Personal Deposit Account Administrator) (VPDA) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१२) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची सहायक अनुदानाची देयके कोषागारातून आहरीत करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना संवितरण करण्यासाठी "प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई" यांना आहरण व संवितरण अधिकारी व "सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई" यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

१३) प्रस्तुत निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदर खरेदीचा तपशील संपुर्ण अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैदयकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांची राहील.

३. सदर प्रस्तावानुसार खरेदी करावयाच्या औषधांची यादी सोबतच्या परिशिष्ट-अ ते क मध्ये दर्शविलेली आहे.

४. उपरोक्त परि.क्र.२ मधील अनुक्रमांक १ ते १३ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई , मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैदयकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई व सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१२१०३०२३६०१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK VIJAY SHELAR

Digitally signed by DEEPAK VIJAY SHELAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, 2.5.4.20=a8b4d56939f92ca00d0f1036f37e5c0743e0f0aea72b2f23cc46d5945ab37d69, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8E3FEAC5ACB11AE3D9464A8A336D7067314E8F58B632FCBB7B5B4CF900C4649B, cn=DEEPAK VIJAY SHELAR
Date: 2026.08.12 11:54:31 +05'30'

(दीपक शेलार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी , महाराष्ट्र वैदयकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.

४) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),मुंबई.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२(लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),नागपूर.
८) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१२) निवडनस्ती (खरेदी कक्ष)

(शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१००/खरेदी कक्ष-,दि.१२.०८.२०२६ चे सहपत्र)

परिशिष्ट-अ

(रक्कम रुपयात)

Statement of Medicine for Administrative Approval 2026-27						
Budget: State Budget -Epidemic Control Programme 2210 4286					**Proposal Value :Rs 1000000**	
Sr. No.	**Sr. No. in SDL**	**Rate Per Unit (Approx.)**	**Drug Name**	**Annual Demand 2024-25**	**WBD Pune 1 (2026-27)**	
					Quantity Proposed	**Total Cost for Purchase**
1	170	0.74	Ciprofloxacin Tab. 250mg [69.1]	76869562	210000	1,55,400.00
2	181	0.95	Doxycycline Cap / Tab 100mg [65.1]	52082454	131000	1,24,450.00
3	198	0.43	Metronidazole Tab 200mg [78.1]	51187405	464993	1,99,947.00
4	302	6.28	Furazolidone 25mg/5ml, 60 ml Bottle [121.2]	5021370	30987	1,94,598.00
5	833	3.8	Chlorine Tab (Sodium Dichloroisocyanurate Available chlorine) 250mg [399.2]	733197	33000	1,25,400.00
6	1110	14.83	Ringer Lactate Inj. I.V 500ml [262.1]	5043120	13500	2,00,205.00
Total						**10,00,000**

(शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१००/खरेदी कक्ष-,दि.१२.०८.२०२६ चे सहपत्र)

परिशिष्ट -ब

(रक्कम रुपयात)

Statement of Medicine for Administrative Approval 2026-27						
Budget: State Budget -Epidemic Control Programme 2210 0629					**Proposal Value :Rs 300000**	
Sr. No.	**Sr. No. in SDL**	**Rate Per Unit (Approx.)**	**Drug Name**	**Annual Demand 2024-25**	**WBD Pune 1 (2026-27)**	
					Quantity Proposed	**Total Cost for Purchase**
1	303	0.31	Furazolidone Tab 100mg [121.1]	87394378	**967741**	**2,99,999.71**
Total R/off =						**3,00,000.00**

(शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१००/खरेदी कक्ष-,दि.१२.०८.२०२६ चे सहपत्र)

परिशिष्ट -क

(रक्कम रुपयात)

अ. क्रं	अनुदान स्त्रोत	प्रस्तावित बाबी			एकूण खरेदीच्या बाबी
		औषध (SDL)	औषध साहित्य (SCL)	इतर बाबी (Non SDL-SCL)	
१	साथरोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० ४२८६)	६	०	०	६
२	पटकी नियंत्रण कार्यक्रम (२२१० ०६२९)	१	०	०	१
एकूण		**७**	**०**	**०**	**७**
एकूण खरेदीची रक्कम रुपये			**रु १३,००,०००/-**		